# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/03/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. कुही :–** अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा तारणी शेत शिवार येथे दिनांक १५/०३/२०२३ चे १७:००वा. ते दिनांक १६/०३/२०२३ चे ०८:०० वा. दर. यातील फिर्यादी नामे– प्रकाश धनराज हटवार वय ४४ वर्ष रा. वार्ड नं. ३ ता. कुही जि. नागपुर यांचा तारणी तालुका कुही येथील शेतामधील शेतघरात काढून ठेवलेला चना ५७ कट्टे प्रत्येकी ७० किलो वजनाचे असा एकुण ३९ क्विंटल किंमती अंदाजे १,६७,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने दिनांक १५/०३/२०२३ चे १७/०० वाजता ते दिनांक १६/०३/२०२३ चे ०८/०० वाजता दरम्यान चन्याचे ५७ कट्टे प्रत्येकी वजन ७० किलो असा एकुण ३९ क्विंटल चना त्याचा बाजार भावाने किंमती प्रत्येकी ४३००/– रूपये भाव असा ३९ क्विंटल किंमती अंदाजे १,६७,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. विवेक सोनवणे पोस्टे कुही, मो. नं. ८८०५७३०३६२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर नगपुर ते भंडारा एम एच ५३ रोड कलकत्ता ढाबा जवळ येथे दिनांक १६/०३/२०२३ चे १२.३० वा. सुमारास कंटेनर क्र जी.जे–०५ बी.एक्स–८३६९ हा आपला कंटेनर कलकत्ता ढाबा कडे पलटवित असता नागपुर ते भंडारा रोडनी जाणारी मोटार सायकल क्र. एम एच ३१ डीएल ६९२५ चा चालक विधीसंघर्ष बालक हा आपल्या मोटरसायकलवर ट्रीपल सीट बसवुन वाहन चालविण्याचा परवाना नसतांना आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निश्काळजीपणे चालवुन कंटेनरच्या मध्ये धडक मारून तो स्वत: व त्याचे सोबत असलेली नामे– टिना राउत जखमी होवुन त्याची **बहीण मृतक नामे–सौ दिव्या सौरभ ढबाले, वय २३ वर्ष, वडोदा** हिचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७ ,३०४अ, भादवि १८४, ४(१), १८१, १२८, १९४ मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१६९ मेश्राम मो. नं. ९८२२५४५१६९ करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर